# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक : ०२२ ६६४०५०६६ संकेतस्थळ : https://mhada.gov.in

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ १६५ दि. १८/०१/२०२१

प्रसिद्धी पत्रक

# कोंकण मंडळाच्या सन २०१४, सन २०१६ व सन २०१८ च्या सोडतीतील पात्र लाभार्थ्यांना विक्री किंमत भरण्याकरिता मुदतवाढ

मुंबई, दि. १८ जानेवारी, २०२१ :- कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर लागू टाळेबंदीच्या कालावधीचे गांभीर्य लक्षात घेता म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाने सन २०१४, सन २०१६ व सन २०१८ च्या सदनिका सोडतीमधील यशस्वी व पात्र लाभार्थ्यांना सदनिकेची विक्री किंमत भरण्याकरिता दिनांक १५ मार्च, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

कोरोना विषाणू प्रादुर्भावाने उद्भवलेल्या परिस्थितीत लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे सोडतीतील यशस्वी व पात्र लाभार्थ्यांना सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा विहित वेळेत करता आलेला नव्हता. त्यामुळे सदर यशस्वी व पात्र लाभार्थ्यांकडून विक्री किंमत भरण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर यावर उपाययोजना म्हणून कोंकण मंडळातर्फे दिनांक १५ डिसेंबर, २०२० पर्यंत उपरोक्त सोडतीतील पात्र लाभार्थ्यांना सदनिकेची विक्री किंमत भरण्याकरिता बिनव्याजी मुदतवाढ देण्यात आली होती. या मुदतवाढीनंतरही काही पात्र लाभार्थ्यांना विक्री किंमतीचा भरणा करता आलेला नाही. त्यांच्यासाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय कोंकण मंडळाने घेतला आहे.

म्हाडाने मुदतवाढ देण्याबाबत घेतलेल्या निर्णयाबाबतची माहिती संबंधित बँकेलाही देण्यात आली असून संबंधित पात्र अर्जदारांनी त्यांना नेमून दिलेल्या संबंधित बँकेमध्ये विक्री किंमतीचा भरणा तात्काळ व विहित मुदतीत करावा. या मुदतवाढीनंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसून म्हाडा सदनिका वितरणाच्या विहित नियमानुसार सदनिका विक्री किंमतीचा भरणा अर्जदारांना करावा लागणार आहे, असे कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. नितीन महाजन यांनी कळविले आहे.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा